सकाळ

# पालकांच्या मेहनतीचे चीज होणे अतिशय महत्त्वाचे

## कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे; टुरिझम कंपनीच्या नियुक्तीपत्राचे २० विद्यार्थ्यांना वितरण

सकाळ वृत्तसेवा

गडचिरोली, ता. १५ : कुठलेही विद्यापीठ चार पायऱ्यांवर काम करते. विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, शिकवणे, परीक्षा घेणे, निकाल लावणे.

पण ज्या दिवशी पदवी परीक्षेचा निकाल लागतो, तेव्हा त्यांच्यापुढे शून्य उभा राहतो आणि आता पुढे काय करायचे, या प्रश्नाला आकार देण्याचे काम विद्यापीठाच्या सेंट्रल प्लेसमेंट सेलने केला आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या मागे पालकांची वीस ते पंचवीस वर्षांची मेहनत असते. या मेहनतीचे चीज होणे महत्त्वाचे असते आणि पालकांचे समाधानही चिरकालीन टिकवायचे असते, असे प्रतिपादन गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी केले.

गोंडवाना विद्यापीठातील सेंट्रल प्लेसमेंट सेलतर्फे आयोजित युनिव्हर्स अ‍ॅग्रो टुरिझम प्रा. लि. कंपनीकडून गुरुवार (ता. १४) २० विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. त्या कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानाहून बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. अनिल चिताडे, युनिव्हर्स अ‍ॅग्रो टुरिझम प्रा. लि. कंपनीचे प्रमुख भारत घोटे, विज्ञान आणि तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. सुरेश रेवतकर, सेंट्रल प्लेसमेंट समन्वयक डॉ. अनिरुद्ध गचके आदी उपस्थित होते.

### आनंदाने फुलले चेहरे

विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा, त्यांचा आर्थिक स्तर वाढावा, या उदात्त हेतूने प्रेरित होऊन गोंडवाना विद्यापीठाच्या सेंटर प्लेसमेंट सेलतर्फे युनिव्हर्स टुरिझम कंपनीकडून प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. यात गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा समावेश होता. त्यातून २० विद्यार्थ्यांची निवड युनिव्हर्स अ‍ॅग्रो टुरिझम कंपनीकडून करण्यात आली. त्या विद्यार्थ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी विद्यार्थी तसेच पालकांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.



गडचिरोली : नियुक्तीपत्राचे वितरण करताना कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे.

युनिव्हर्स अ‍ॅग्रो टुरिझम कंपनीचे प्रमुख, उद्योजक भारत घोटे म्हणाले, गोंडवाना विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांसाठी संधीचे हे नवे दालन आहे. गोंडवाना विद्यापीठ आणि युनिव्हर्सल अ‍ॅग्रो टुरिझम प्रा. लि. यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. याप्रसंगी विद्यार्थ्यांचे पालक रूपी होडी आणि रामचंद्र भुसारे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या मार्गदर्शनात विज्ञान आणि तंत्रज्ञान अधिष्ठाता डॉ. सुरेश रेवतकर, ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर पदव्युत्तर शैक्षणिक विभाग उत्तमचंद कांबळे आणि समन्वयक अनिरुद्ध गचके यांच्या प्रयत्नांचे हे फलित असल्याचेही कार्यक्रमात सांगण्यात आले. संचालन आणि आभार ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट ऑफिसर उत्तमचंद कांबळे यांनी केले.

TheHitavada
Vidarbha Line | 2022-07-16 | Page- 5
ehitavada.com

# Dr Prashant Bokare hails Gondwana University's Central Placement Cell

**District Correspondent**
GADCHIROLI, July 15

"A UNIVERSITY operates in four stages- admit students, teach, conduct examinations and announce results. However, on the day the results, most of the students are completely clueless as to what do they want to do next. The Gondwana University has resolved this issue through its newly formed Central Placement Cell," said Dr Prashant Bokare, Vice-Chancellor of Gondwana University.

He was speaking at a programme organised to issue appointment letters to 20 students through Universe Agro Tourism Pvt Ltd organized by Central Placement Cell at the University.

"There is 20-25 years of hard work of parents behind their child and it is important that this hard work pays off," said Dr Bokare.

The Pro-VC Dr Shriram Kavale, Registrar Dr Anil Z Chitade, Head of Universe Agro Tourism Bharat Dhote, Dean of Science and Technology Department Dr Suresh Rewatkar and Central Placement Coordinator Aniruddha Gachke were also present on the occasion.

Entrepreneur Bharat Dhote, Head of Universe Agro Tourism Company, said, "It is our intention to paint a golden page for the future of students by giving employment to them and this will be a new chapter for students of Gondwana University."



Dr Prashant Bokare, Vice-Chancellor of Gondwana University, handing over appointment letter to a student as other dignitaries look on.

A memorandum of understanding (MoU) was also signed between Gondwana University and Universal Agro Tourism.

The placement drive was organised by Universe Tourism Company through the Central Placement Cell of Gondwana University with the intention of providing employment to the students and raising their financial status. This included students from colleges affiliated to the University. Out of these, 20 students were selected by the company. The students as well as the parents were overjoyed when the appointment letters were handed over to them.

The drive was held with the efforts of Dr Suresh Rewatkar, Training and Placement Officer, Uttamchand Kamble, Post Graduate Education Department, and Aniruddha Gachke, Coordinator, under the guidance of Dr Prashant Bokare. The programme was conducted by Uttamchand Kamble, Training and Placement Officer.

Powered by iDocuments